# पदभरती जाहीरात

## राष्ट्रीय आरोग्य अभियान

जिल्हा आरोग्य सोसायटी, जिल्हा परिषद, सातारा अंतर्गत खालील कंत्राटी रिक्त पदे संवर्गनिहाय मुलाखत व कौशल्य चाचणीद्वारे भरावयाची आहेत.

| अ. क्र. | पदाचे नाव | रिक्त पदे | नियुक्तीचे ठिकाण कार्यक्रम नाव | वय | शैक्षणिक अर्हता | संवर्ग | एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | Nephrologist (Super Specialist) | १ | **DH Satara** | ७० वर्षे | DM Nephrology | अ.जा.१ | रु.१२५०००/- प्रति माह |
| २ | Cardiologist (Super Specialist) | १ | **DH Satara** | ७० वर्षे | DM Cardiology | खुला-१ | रु.१२५०००/- प्रति माह |
| ३ | Anesthetist (Specialist) | ६ | **SDH Karad-2<br>SDH Phaltan-1<br>RH Wai-1,<br>RH Patan-1,<br>RH Pimpoda-1** | ७० वर्षे | MD Anesthesia/ DA/DNB | अ.जा.१<br>अ.ज.१<br>भ.ज.क.१<br>भ.ज.क.१<br>वि.मा.प्र.१<br>इ.मा.व. १<br>एसईबीसी-१<br>ईडबल्युएस-१ | रु.७५०००/- प्रति माह |
| ४ | OBGY Gynecologist (Specialist) | २ | **SDH Karad-1<br>SDH Phaltan-1** | ७० वर्षे | MD/MS Gyn/DGO/ DNB | इ.मा.व.१<br>एसईबीसी-१ | रु. ७५०००/- प्रति माह |
| ५ | Pediatrician (Specialist) | ८ | **DH Satara-3**<br>(SNCU-1,<br>FRU-2)<br>**SDH Karad-1<br>RH Wai-1,<br>RH Pimpoda-1,<br>RH Patan-1<br>RH Undale-1** | ७० वर्षे | MD Ped./DCH/ DNB | अ.जा.१<br>अ.ज.१<br>वि.जा.अ.१<br>भ.ज.ड .१<br>इ.मा.व.२<br>एसईबीसी-१<br>ईडबल्युएस-१<br>खुला-१ | रु.७५०००/- प्रति माह |
| ६ | Physician (Specialist) | ७ | **DH Satara-4**<br>(FRU-2<br>NPCDCS-1,<br>NPHCE-1)<br>**RH Wai-1<br>SDH Phaltan-1<br>SDH Karad-1** | ७० वर्षे | MD Medicine/ DNB | अ.जा.१<br>अ.ज.१<br>इ.मा.व.२<br>एसईबीसी-१<br>खुला-२ | रु.७५०००/- प्रति माह |
| ७ | Surgeon (Specialist) | २ | **DH Satara-1<br>SDH Karad-1** | ७० वर्षे | MS General Surgery/ DNB | एसईबीसी-१<br>इ.मा.व.१ | रु.७५०००/- प्रति माह |
| ८ | Pathologist | १ | **DH Satara** | ७० वर्षे | MD Pathology/ DNB/DPB | ईडबल्युएस-१ | रु.७५०००/- प्रति माह |
| ९ | Radiologist | १ | **DH Satara** | ७० वर्षे | MD Radiology/ DMRD | खुला-१ | रु.७५०००/- प्रति माह |
| १० | Psychiatirst | १ | **DH Satara**<br>(NMHP) | ७० वर्षे | MD Psychiatry/ DPM/DNB | खुला-१ | रु.७५०००/- प्रति माह |

Scanned with CamScanner

| अ. क्र. | पदाचे नाव | रिक्त पदे | नियुक्तीचे ठिकाण कार्यक्रम नाव | वय | शैक्षणिक अर्हता | संवर्ग | एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ११ | Medical Officer MBBS | ९ | SNCU Karad-1 SNCU Satara-3 Hematology DH Satara-1 **NCD-4:-** (SDH Phaltan, RH Aundh, RH Dahiwadi, RH Koregaon-1) | खुला ३८ व राखीव ४३ NHM कर्मचारी ५ वर्षे शिथिल, निवृत्त शासकीय अधिकारी ७० वर्षे | MBBS | अ.ज.१ इ.मा.व.२ एसईबीसी-३ ईडबल्युएस-३ | रु.६००००/- प्रति माह |
| १२ | Medical Officer MBBS | २ | NUHM Satara-2 | | MBBS | इ.मा.व.१ एसईबीसी-१ | रु.४५०००/- प्रति माह |
| १३ | Medical Officer AYUSH UG (RBSK) | १३ | **Male-7** (RH Mshwar-1 RH Koregaon-2, RH Dahiwadi-1, SDH Karad-1, RH Patan-2) **Female-6** (RH Mshwar-1, RH Medha-1, RH Koregaon-1, RH Dahiwadi-2, RH Patan-1) | खुला ३८ व राखीव ४३ NHM कर्मचारी ५ वर्षे शिथिल | MBBS/ BAMS | अ.ज.१ वि.जा.अ.१ एसईबीसी-३ ईडबल्युएस-२ / एसईबीसी-२ ईडबल्युएस-२ वि.जा.अ.१ भ.ज.क.१ | रु.२८०००/- प्रति माह |
| १४ | DEIC Optometrists | १ | **DH Satara** (DEIC) | खुला- ३८ | Batchler in Optometry from Recognised Univercity 1 Yrs Experience | खुला-१ | रु.२००००/- प्रति माह |
| | एकुण पदे | ५५ | | | | | |

<u>अटी व शर्ती:-</u>

१) उपरोक्त पदे ही कंत्राटी स्वरुपाची असुन नियुक्तीचा कालावधी ११ महिन्याचा असेल.

२) जाहीरातीतील पदे राज्य शासनाची नियमित पदे नसुन निव्वळ कंत्राटी स्वरुपातील पदे आहेत. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागु नाही, तसेच अर्जदाराला शासकीय नियमित सेवेत सामावुन घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्यासबंधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.

३) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

४) उपरोक्त कंत्राटी पदांकरीता दरमहा एकत्रित मानधन देण्यात येईल.

५) सेवानिवृत्त विशेषतज्ञ यांची निवड झालेस सदर पदांकरीता मानधन राज्य स्तरावरुन प्राप्त विहीत मार्गदर्शक सुचनांनुसार मोजमाप करुन अदा करण्यात येईल याची नोंद घ्यावी. मा. सहसंचालक (अतांत्रिक) राआअ, मुंबई यांचे पत्र दि. १६-०१-२०१७ मधील सुचनेनुसार सेवानिवृत्त अधिकारी यांना सेवानिवृत्तीची प्राप्त कागदपत्राच्या आधारे मानधन अंतिम करुन अदा केले जाईल.

**६) विशेषतज्ञ या पदांकरीता शासकीय सेवेतुन सेवानिवृत्त/स्वेच्छा सेवानिवृत्त विशेषतज्ञ/अधिकारी या पदांकरीता अर्ज करीत असल्यास त्यांनी शासकीय सेवेत रुजु झालेचा दिनांक, कार्यकाळ, पदनाम व निवृत्त झालेले वर्ष, सेवानिवृत्तीच्या दिनांकास मिळालेले अंतिम वेतन व सेवा निवृत्ती नंतर देय असलेने वेतन/पेन्शन याबाबतची संपुर्ण**

Scanned with CamScanner

**माहिती अर्जामध्ये नमुद करावी. सदर माहिती सादर न करणाऱ्या निवृत्त अधिकारी अर्जदाराचा अर्ज अपात्र करणेत येईल.**

७) **जाहीरातीतील रिक्त पदांच्या संख्येत बदल होऊ शकतो तसेच रिक्त ठिकाणमध्ये बदल होऊ शकतो. त्याबाबतचे अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. सातारा यांनी राखुन ठेवलेला आहे.**

८) अनुभवी व उच्च शैक्षणिक अर्हताधारकास प्राधान्य दिले जाईल.

९) **Specialist पद क्र. ३ ते ७ पदासाठी एकत्रित मानधन व्यतिरिक्त मा. आयुक्त व अ भियान संचालक एनएचएम, मुंबई यांचे पत्र दि. २१-०६-२०१८ प्रमाणे जादा कामासाठी दिलेल्या नॉर्मप्रमाणे वाढीव मानधन अदा केले जाईल, त्यासाठी त्यांनी दिलेल्या ओपीडी व आयपीडी वेळेत सेवा देणे बंधनकारक राहील.**

१०) एकापेक्षा अधिक पदांकरीता अर्ज करावयाचा असल्यास उमेदवारांनी प्रत्येक पदाकरीता स्वतंत्र अर्ज सादर करावेत.

११) एकापेक्षा अधिक पदांकरीता अर्ज करताना अर्जासोबत पदांचा प्राधान्यक्रम मुलाखतीचे पुर्वी कार्यालयास सादर करावा.

१२) निवड प्रक्रियेतील पात्र/अपात्र उमेदवारांची यादी तसेच निवड यादी राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर व सातारा जिल्हा परिषदेच्या **www.zpsatara.gov.in** वेबसाईटवर प्रसिध्द करणेत येईल, याबाबत कोणताही स्वतंत्र पत्रव्यवहार उमेदवारांसोबत केला जाणार नाही.

१३) निवड यादीतील गुणाक्रमांकाच्या आधारे प्राधान्याने पदस्थापना दिली जाईल, त्याबाबत उमेदवाराने कुठल्याही दबावतंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवाराची निवड रदद करण्यात येईल.

१४) जाहीरातीच्या दिवशी सदर पदासाठी कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे व राखीव प्रवर्गासाठी ४३ वर्षे राहील.

१५) शासकीय/निमशासकीय तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत असणाऱ्या अनुभवाचाच विचार निवड प्रक्रियेत करण्यात येईल.

१६) विशेषतज्ञ पदासाठी सेवा उमेदवारांना कमाल वयोमर्यादा ७० वर्षे राहील, तसेच मानसिकदृष्टया सक्षम असल्याचे जिल्हा शल्यचिकित्सक यांचे वैद्यकिय प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. त्यानंतरच नियुक्ती आदेश देण्यात येईल.

१७) अर्जदाराला कंत्राटी कालावधीत सोईनुसार ठिकाण बदलुन मिळण्याची मागणी करता येणार नाही.

१८) उपरोक्त पदांपैकी तांत्रिक पदांकरीता, वैद्यकिय अधिकारी ई. पदांकरीता तत्सम कौन्सिलचे रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील. अन्यथा उमेदवारस मुलाखतीस अपात्र ठरविले जाईल.

१९) भरती प्रक्रिया स्थगित करणे/रदद करणे/पदभरती प्रक्रियेत बदल करण्याचे सर्व अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावर राखीव ठेवण्यात आलेले आहेत. याबाबत कोणालाही कोणताही दावा करता येणार नाही.

२०) मुलाखतीकरीता उपस्थित उमेदवारांना प्रवासभत्ता अथवा इतर कोणताही भत्ता देय राहणार नाही. तसेच एक कोरा लिफाफा ज्यावर रु.५/- टपाल तिकीट लावुन स्वतःचे नाव व पत्ता प्रती या ठिकाणी लिहुन अर्जासोबत जोडावा.

२१) सदर भरतीची प्रक्रिया पुर्ण झालेनंतर भविष्यात रिक्त होणाऱ्या ठिकाणी कर्मचारी यांनी राजीनामा दिलेमुळे जागा रिक्त झालेस प्रतिक्षा यादीवरील उमेदवारास नविन भरती प्रक्रिया न करता नियुक्ती आदेश दिले जातील. प्रतिक्षा यादी प्रसिध्द झालेपासुन १ वर्षाच्या कालावधीपर्यंत वैध राहील.

२२) खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी रु.१५०/- व राखीव प्रवर्गातील उमेदवारांनी रु.१००/- ची रक्कम ऑनलाईन पध्दतीने भरावी लागेल.

Scanned with CamScanner

23) सदरहु भरती प्रक्रियेकरीता ऑनलाईन अर्ज करणेची मुदत दि. २६/०६/२०२० अखेर राहणार असुन तदनंतर अर्जाची छाननी, लेखी परिक्षा/ मुलाखत प्रक्रिया, निवड यादी प्रसिध्द करणे, हरकती/आक्षेप प्राप्त करुन घेणे व त्या निकाली काढणे आदी रितसर शासनाच्या तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियानाकडील प्राप्त मार्गदर्शक सुचनांनुसार भरती प्रक्रिया पार पाडुन निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश देणे इ. बाबत सविस्तर तपशिल वेळोवेळी सातारा जिल्हा परिषदेच्या वेबसाईटवर www.zpsatara.gov.in तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान विभागाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करणेत येईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. याबाबत पुनश्च वर्तमानपत्रामध्ये जाहीरात दिली जाणार नाही. तसेच उमेदवाराला मोबाईलद्वारे कळविले जाणार नाही.

- **अर्ज भरण्याचा कालावधी :- दि. २२/०६/२०२० ते दि. २६/०६/२०२० रोजी संध्याकाळी ०६.०० पर्यंत**
- **पदांची माहिती, संख्या, संवर्ग व पदस्थापना पाहण्याचा वेबसाईटचा पत्ता:- www.zpsatara.gov.in**
- **ऑन लाईन अर्ज भरण्याची लिंक:-** http://bit.ly/NHMSTR
- OR QR Code

**खालीलप्रमाणे आवश्यक असलेल्या मुळ कागदपत्रांच्या साक्षांकीत केलेल्या छायांकीत प्रती अर्जासोबत जोडाव्यात.**

१. शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे व गुणपत्रिका

२. राखीव पदांसाठी जातीचे प्रमाणपत्र

३. शाळा सोडल्याचा/जन्म तारखेचा दाखला

४. प्रमाणित केलेले अनुभव प्रमाणपत्रे

५. पासपोर्ट आकाराचे २ फोटो

६. फक्त शासकीय/निमशासकीय व राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत अनुभव असलेस अनुभव दाखला

| | | | |
|---|---|---|---|
| सही | सही | सही | सही |
| सदस्य सचिव | सदस्य | सदस्य | अध्यक्ष, निवड समिती |
| जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक | जिल्हा शल्यचिकित्सक | जिल्हा आरोग्य अधिकारी | मुख्य कार्यकारी अधिकारी, |
| एनएचएम,जि.प. सातारा | जिल्हा रुग्णालय, सातारा | जिल्हा परिषद, सातारा | जिल्हा परिषद, सातारा |

Scanned with CamScanner